.nagpur

# NMC e NEWS LETTER

नोव्हेंबर २०१८

/nmcngp/ /ngpnmc/ www.nmcnagpur.gov.in/ http://news.nmcnagpur.org/

## थोडक्यात

### आयुक्त अभिजीत बांगर यांनी स्वीकारला पदभार



नागपूर : नागपूर महानगरपालिकेचे नवनियुक्त आयुक्त अभिजीत बांगर यांनी बुधवारी (ता. १४) पदभार स्वीकारला. यावेळी अपर आयुक्त रवींद्र ठाकरे यांनी पुष्पगुच्छ देउन नवनियुक्त आयुक्त अभिजीत बांगर यांचे स्वागत केले.नागपूर महापालिकेचे नवनियुक्त आयुक्त अभिजीत बांगर हे एप्रिल २०१७ पासून अमरावती येथे जिल्हाधिकारीपदी कार्यरत होते. ते मूळ उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब येथील असून अनेक वर्षे त्यांचे वास्तव्य बार्शी येथे होते. त्यांनी पुणे येथे अर्थशास्त्र या विषयात एम. ए. केले आहे. काही काळ गोखले इन्स्टिट्यूटमध्ये प्राध्यापक म्हणूनही त्यांनी काम केले आहे. बांगर २००८ च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. त्यांनी नागपूर येथे सहायक जिल्हाधिकारी, रायगड जिल्ह्यातील माणगाव येथे सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी म्हणून काम केले. पालघर या नवनिर्मित जिल्ह्याचे पहिले जिल्हाधिकारी म्हणून ऑगस्ट २०१४ रोजी त्यांनी पदभार स्वीकारला होता.

### मनपा शाळेतील विद्यार्थ्यांचे यश



नागपूर : सूचना आणि प्रसारण मंत्रालय, फिल्ड आउटरिच ब्युरो, नागपूरद्वारा स्वच्छ भारत अभियान (शहरी) विशेष जनजागृती अभियानांतर्गत आयोजित चित्रकला व निबंध स्पर्धेमध्ये नागपूर महानगरपालिका व कलादालनच्या विद्यार्थ्यांनी यश संपादित केले. गुरूवारी (ता. २९) नागसेन विद्यालय कामठी रोड येथे स्वच्छता अभियानांसदर्भात जनजागृती करणारी चित्रकला व निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.स्पर्धेमध्ये एकूण ३५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. निबंध स्पर्धेमध्ये रा.बा.गो.गो. शाळेतील शाहिना फकरुद्दीन अंसारी या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक पटकाविला. तर याच शाळेतील रोशनी खरवार या विद्यार्थिनीने चित्रकला स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांकावर बाजी मारली. याशिवाय चित्रकला स्पर्धेतील इयत्ता पाचवी ते सातवीच्या गटामध्ये बोरगाव हिंदी उच्च शाळेतील रोशन अंसारी या विद्यार्थ्याने चित्रकला स्पर्धेत तृतीय व याच शाळेतील शांती मुकेश शाहु या विद्यार्थिनीने निबंध स्पर्धेमध्ये तृतीय स्थान प्राप्त केले. स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी शाळा निरीक्षक माया पजई, पुरूषोत्तम कळमकर, मनपा कलादालन प्रमुख सूर्यकांत मंगरुळकर, उषा तभाने, शारदा खंडारे, सीमा कालवानी, गीता पटेल आदींनी सहकार्य केले.

### स्वच्छ भारत मिशन अंतर्गत महापालिकेच्या कर्मचाऱ्यांची कार्यशाळा



नागपूर : स्वच्छ सर्वेक्षण २०१९ च्या पूर्वतयारीसाठी स्वच्छ भारत मिशन अंतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांची कार्यशाळा बुधवार (ता.२८)ला महाल येथील राजे रघुजी भोसले नगर भवन येथे आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेला प्रमुख अतिथी म्हणून सेंटर फॉर सेस्नेटेबल डेव्हल्पमेंट संस्थेच्या लिना बुधे, स्वच्छ मंचच्या अनसुया छाब्रानी, सहायक आयुक्त प्रकाश वराडे, अशोक पाटील, सुभाष जयदेव, पशुचिकित्सक डॉ. गजेंद्र महल्ले प्रामुख्याने उपस्थित होते.स्वच्छ भारत मिशन अंतर्गत केंद्र शासनाद्वारे स्वच्छ सर्वेक्षण २०१९ सुरू होत आहे. यासाठी ‘कचरा विलगीकरण’ या विषयावर मार्गदर्शन केले. नागरिकांच्या तक्रारींबाबतही यावेळी चर्चा करण्यात आली. नागरिकांच्या तक्रारी किती सोडविण्यात आल्या याचा आढावा झोनल अधिकाऱ्यांमार्फत घेण्यात आला. यावेळी दहाही झोनचे झोनल अधिकारी, व स्वास्थ निरिक्षक प्रामुख्याने उपस्थित होते.

## नागपुरातील कामाची प्रगती व वेग पाहून प्रभावित : राफ ईकॉर्न

### तीन दिवसीय कार्यशाळेत कार्लस्रू शिष्टमंडळाचा सहभाग



नागपूर : नागपूर शहरात सुरू असलेली विकास कामे येथे येणा–यांना आपल्याकडे आकर्षित करणारी आहेत. ही कामे झपाट्याने होत असल्याने आपसूकच भुवया उंचावल्या जातात. नागपुरात सुरू असलेली विविध प्रकारची विकास कामे ही प्रभावित करणारी आहेत, असे प्रतिपादन कार्लस्रूच्या इकॉनॉमिक डेव्हलपमेंट डिपार्टमेंटचे इनोव्हेशन हेड रॉफ ईकॉर्न (Mr. Ralf Eichhorn) यांनी केले.स्मार्ट सिटीअंतर्गत असलेल्या ‘सिटी टू सिटी पेअरिंग’ कार्यक्रमांतर्गत नागपूर आणि जर्मनीतील कार्लस्रू शहरांमध्ये झालेल्या करारानुसार कार्लस्रू येथील शिष्टमंडळासाठी नागपूर स्मार्ट ण्ड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेडतर्फे ‘इंटरनॅशनल अर्बन को–ऑपरेशन’ या विषयावर तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचा शुक्रवारी (ता. ३०) समारोप झाला. मनपा मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीमध्ये आयुक्त कार्यालय सभागृहात आयोजित कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी एनएसएससीडीसीएल चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रामनाथ सोनवणे, कार्लस्रू शिष्टमंडळातील कार्लस्रूच्या इकॉनॉमिक डेव्हलपमेंट डिपार्टमेंटचे इनोव्हेशन हेड राफ ईकॉर्न (Mr. Ralf Eichhorn), कार्लस्रू डिजीटलचे स्टीफन बुल्ह (Mr. Steffen Buhl), कार्लस्रू अर्बन प्लानिंग डिपार्टमेंटच्या प्रा. डॉ. इंग अँक कारमन–वोएस्नर (Ms Prof. Dr.-Ing. nke Karmann-Woessner), युनिव्हर्सिटी ऑफ अप्लाईड सायंसेस इंस्टिट्यूट ऑफ ट्राफिक ण्ड इन्फ्रास्ट्रक्चरचे प्रा. डॉ. इंग जान रील (Prof. Dr.-Ing Jan Riel), स्ट्रेटॅजी आर्किटेक्ट ऑलिवर विल (Mr. Oliver Will), कार्लस्रूच्या पुणे इनोव्हेशन कार्यालय प्रमुख श्रीमती इरिस बेकर (Ms. Iris Becker), एनएसएससीडीसीएलचे महाव्यवस्थापक राजेश दुफारे, विजय बनगीरवार, देवेंद्र महाजन, अरुण सेल्वसरू, मेट्रोचे कार्यकारी संचालक (नियोजन) एस.के. सिंगला, सहमहाव्यवस्थापक महेश गुप्ता, इंटरनॅशनल अर्बन को–ऑपरेशनचे आशीष पंडित, आशीष वर्मा आदी उपस्थित होते. नागपूर शहरामध्ये यापूर्वी जानेवारी महिन्यात भेट दिली असता शहरातील विकास कामे पाहता आली. त्यानंतर आता पुन्हा शहरात भेट देण्याची संधी मिळाल्याने शहरातील विकास कामांच्या प्रगतीने पहिल्याच दिवशी प्रभावित केले. स्मार्ट सिटी, मेट्रो व इतर विकास कामांमुळे नागपूर शहर भविष्यात एक रोल मॉडेल ठरणार, असा आशावादही यावेळी कार्लस्रूच्या शिष्टमंडळातील पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. स्मार्ट सिटीची संकल्पना स्पष्ट करताना एनएसएससीडीसीएल चे सीईओ डॉ. रामनाथ सोनवणे म्हणाले, स्मार्ट सिटी म्हणजे दररोज चारचाकी वाहनातून नोकरी अथवा कार्यस्थळी जाणे व परत येणे नव्हेक. आपल्या आरोग्याची काळजी घेत व पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने विचार करून पायी अथवा सायकलचा वापर करून आपल्या कार्यस्थळी पोहोचणा–या व्यक्तींच्या शहराला ख–या अर्थाने स्मार्ट सिटी म्हणता येईल. तीन दिवसीय कार्यशाळेत नागपूर आणि कार्लस्रू या दोन्ही शहरांकडून प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असल्याची माहिती एनएसएससीडीसीएल चे सीईओ डॉ. रामनाथ सोनवणे यांनी यावेळी दिली. नागपूर शहराला प्रदूषण मुक्त करण्याच्या उद्देशाने व कार्लस्रूमधील पर्यावरणपूरक सार्वजनिक सायकल वाहतूक व्यवस्था राबविण्याच्या उद्देशाने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली. नागपूर शहरामध्ये सायकल वाहतुकीची संकल्पना रुजविण्यासाठी त्याबाबत जनजागृती होणे आवश्यक आहे. जर्मनीमधील दोन विद्यार्थीनी शहरात वास्तव्यास असून या सायकल वाहतूक जनजागृती अभियासाठी या विद्यार्थीनी पुढाकार घेणार आहेत, असेही एनएसएससीडीसीएल चे सीईओ डॉ. रामनाथ सोनवणे यांनी सांगितले. तीन दिवसीय कार्यशाळेमध्ये सहभागी कार्लस्रूच्या शिष्टमंडळातील सर्व मान्यवरांचा एनएसएससीडीसीएल चे सीईओ डॉ. रामनाथ सोनवणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



## कार्लस्रूमधील पर्यावरणपूरक वाहतूक प्रकल्प नागपूरसाठी लाभकारक : आयुक्त

नागपूर : कार्लस्रू शहरातील पर्यावरणपूरक वाहतूक व्यवस्था नागरिकांच्या आरोग्यासाठी लाभदायक आहे. तशा प्रकारची वाहतूक व्यवस्था भविष्यात नागपुरात अस्तित्वात आली तर नागपूर शहर संपूर्ण देशासाठी आदर्श ठरेल. स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत ‘सिटी टू सिटी पेअरिंग’च्या दोन्ही शहरांतील उत्तम प्रकल्पांची देवाणघेवाण होते. कार्लस्रूमधील चांगले प्रकल्प नागपुरात राबविण्यात येईल, असा विश्वास नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त अभिजीत बांगर यांनी व्यक्त केला.स्मार्ट सिटीअंतर्गत असलेल्या ‘सिटी टू सिटी पेअरिंग’ कार्यक्रमांतर्गत नागपूर आणि जर्मनीतील कार्लस्रू शहरांमध्ये झालेल्या करारानुसार कार्लस्रू येथील शिष्टमंडळ नागपुरात दाखल झाले आहे. नागपूर स्मार्ट ण्ड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेडतर्फे ‘मोबीलाईज युअर सिटी’ या विषयावर मनपा मुख्यालयातील आयुक्त कार्यालय सभागृहात आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी एनएसएससीडीसीएलचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रामनाथ सोनवणे, एनएसएससीडीसीएलचे मुख्य महाव्यवस्थापक राजेश दुफारे, विजय बनगीरवार, देवेंद्र महाजन, मेट्रोचे कार्यकारी संचालक (नियोजन) एस.के. सिंगला, सहमहाव्यवस्थापक महेश गुप्ता, वाहतूक पोलिस विभागाचे उपायुक्त राजतिलक रोशन, मनपाचे परिवहन व्यवस्थापक शिवाजी जगताप, वाहतूक अभियंता आसाराम बोदिले,रजनीश पोरवाल, जीटीचे प्रकल्प संचालक अरुण सेलवरसु, मनपाचे शहर अभियंता मनोज तालेवार उपस्थित होते. कार्लस्रू शिष्टमंडळात कार्लस्रूच्या इकॉनॉमिक डेव्हलपमेंट डिपार्टमेंटचे इनोव्हेशन हेड राफ ईकॉर्न (Mr. Ralf Eichhorn), कार्लस्रू डिजीटलचे स्टीफन बुल्ह (Mr. Steffen Buhl), कार्लस्रू अर्बन प्लानिंग डिपार्टमेंटच्या प्रा. डॉ. इंग अँक कारमन–वोएस्नर (Ms Prof. Dr.-Ing. nke Karmann-Woessner), युनिव्हर्सिटी ऑफ अप्लाईड सायंसेस इंस्टिट्यूट ऑफ ट्राफिक ण्ड इन्फ्रास्ट्रक्चरचे प्रा. डॉ. इंग जान रील (Prof. Dr.-Ing Jan Riel), स्ट्रेटॅजी आर्किटेक्ट ऑलिवर विल (Mr. Oliver Will), कार्लस्रूच्या पुणे इनोव्हेशन कार्यालय प्रमुख श्रीमती इरिस बेकर (Ms. Iris Becker), इंटरनॅशनल अर्बन को–ऑपरेशनचे आशीष पंडित, आशीष वर्मा उपस्थित होते. प्रारंभी नागपूर स्मार्ट ण्ड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रामनाथ सोनवणे यांनी नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पासंदर्भात सादरीकरण केले. नागपुरात सदर प्रकल्पांतर्गत सुरू असलेल्या प्रकल्पांची व सद्यस्थितीची माहिती दिली. यानंतर कार्लस्रूच्या इकॉनॉमिक डेव्हलपमेंट डिपार्टमेंटचे इनोव्हेशन हेड राफ ईकॉर्न (Mr. Ralf Eichhorn) आणि कार्लस्रू डिजीटलचे स्टीफन बुल्ह (Mr. Steffen Buhl) यांनी कार्लस्रूच्या अवलंबिलेल्या पद्धतीनुसार शहराचा जो आर्थिक विकास होत आहे, त्याबाबतचे सादरीकरण केले.

## प्रत्येक बालकाला गोवर–रुबेलाची लस द्या : नंदा जिचकार

### महापालिकेद्वारे गोवर रूबेला लसीकरण मोहिमेचा शुभारंभ

नागपूर : नागपूर शहरातील कोणताही मुलगा किंवा मुलगी गोवर रूबेला लसीकरणापासून वंचित राहणार नाही, असे नियोजन करा, असे निर्देश देत पालकांनी आवर्जून ही लस आपल्या पाल्याला देण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन महापौर नंदा जिचकार यांनी केले.नागपूर महानगरपालिकेद्वारे २८ नोव्हेंबर रोजी सिव्हील लाईन्समधील भवन्स बी.पी. विद्या मंदिर येथील विद्यार्थ्यांना गोवर–रूबेला लसीकरण करून मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी वैद्यकीय सेवा व आरोग्य समिती सभापती मनोज चापले, महिला व बालकल्याण समिती सभापती प्रगती पाटील, अतिरिक्त आयुक्त राम जोशी, आरोग्य विभागाचे सहायक संचालक डॉ.संजीव जयस्वाल, आरोग्य अधिकारी (दवाखाना) डॉ.अनिल चिव्हाणे, वैद्यकीय अधिकारी डॉ.विजय जोशी, डॉ.नरेंद्र बहिरवार, डॉ.सुनील धुरडे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. पातूरकर, डॉ. साजीद खान, एस. एम.ओ. (डब्ल्यू. एच.ओ.) दीपाली नागरे, रोटरीचे डॉ. राजन, रोटरी ईशान्यचे चारु बाहेती, आनंद कालरा, गौतम बेद, प्रवीण जांभुळकर, कृष्णा कन्नन, मुख्याधापिका अंजु भूतानी, भवन्सचे श्रीमती दत्ता व चमू प्रामुख्याने उपस्थित होते. गोवर–रूबेला लसीकरण मोहीम महाराष्ट्रात २७ नोव्हेंबरपासून सुरू करण्यात आली आहे. ९ महिन्यांचे बाळ ते १५ वर्षापर्यंतच्या मुला–मुलींना ही लस देण्यात येत आहे. बालकांमध्ये लहान वयातच प्रतिकार शक्ती वाढावी यासाठी ही मोहीम राबविण्यात येत आहे. नागपूर शहरातील सर्व शासकीय व खासगी शाळांमध्ये, शासकीय व खासगी दवाखाने, अनाथ आश्रम यामध्ये ही लस मोफत देण्यात येणार आहे. बुधवारी भवन्स बी.पी. विद्या मंदिरमधील विद्यार्थ्यांना ही लस देण्यात आली. प्रत्येक पालकांनी शाळा अथवा जवळच्या लसीकरण केंद्रात जाऊन पाल्यांना ही लस द्यावी, असे आवाहन महापौर नंदा जिचकार यांनी यावेळी केले. वैद्यकीय सेवेत डॉ. यावलकर, शीतल वांदिले यांनी सहकार्य केले.



## ‘नाग नदी प्रदूषण निर्मूलन प्रकल्पा’साठी जपान देणार अर्थसहाय्य

### ‘जिका’सोबत झाला करार : लवकरच सुरू होणार सर्वेक्षण



नागपूर : ‘नागनदी प्रदूषण निर्मूलन प्रकल्पा’ला जपानची वित्तीय संस्था ‘जिका’ अर्थसहाय्य करणार आहे. त्यादृष्टीने प्रकल्पाची सद्यस्थिती, प्रकल्प अहवाल आणि प्रकल्पातील अन्य बाबींवर चर्चा करण्यासाठी ‘जिका’चे शिष्टमंडळ नागपुरात आले. अर्थसहाय्य देण्याच्या दृष्टीने होणार असलेल्या सर्वेक्षणासंदर्भात बुधवारी (ता. २८) जिका आणि मनपामध्ये झालेल्या करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.यावेळी नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त अभिजीत बांगर, तांत्रिक सल्लागार (नद्या व सरोवरे) मो. इसराईल, जिकाच्या इन्फ्रास्ट्रक्चर इंजिनिअरिंग डिपार्टमेंटचे सिनिअर इंजिनिअरींग ऑफिसर युता टाकाहाशी (Yuta Takahashi), जिकाच्या साऊथ एशिया डिपार्टमेंटचे डेप्युटी असिस्टंट डायरेक्टर झॉ झॉ आंग (Zaw Zaw ung), जिकाच्या साऊथ एशिया डिपार्टमेंटच्या कंट्री ऑफिसर (इंडिया) हारुका कोयामा (Ms. Haruka Koyama) आणि एनजेएस इंजिनिअर्स इंडिया प्रा. लि. चे संचालक विद्यासागर सोनटक्के उपस्थित होते. यांनी नाग नदी प्रदूषण निर्मूलन प्रकल्प महत्त्वाकांक्षी असून या प्रकल्पाच्या माध्यमातून शहरात तीन सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प प्रस्तावित असल्याची माहिती तांत्रिक सल्लागार (नद्या व सरोवरे) मो. इसराईल यांनी दिली. सन २०३४ पर्यंत नाग नदी सांडपाणीमुक्त होईल, असे उद्दिष्ट आहे. या प्रकल्पाला केंद्र शासनाने मंजुरी दिली असून केंद्र शासनाची अधिकृत वित्तीय संस्था ‘जिका’द्वारे अर्थसहाय्य अपेक्षित असल्याचे ते म्हणाले. या प्रकल्पासाठी जिकाने नियुक्त केलेल्या कन्सलटंटच्या माध्यमातून लवकरच सर्वेक्षणाला सुरुवात होणार आहे. सर्वेक्षणानंतर मंजुरीकरिता जपानहून एक स्वतंत्र चमू येईल. त्यांच्या मंजुरीनंतर जपान सरकारची अंतिम मंजुरी मिळेल. अंतिम मंजुरीनंतर अर्थसहाय्य देण्याच्या करारावर राज्य व केंद्र शासनाच्या स्वाक्षऱ्या होतील. सर्वेक्षणाच्या दृष्टीने आवश्यक बाबींची पूर्तता करण्यासंदर्भातील करारावर बुधवारी (ता. २८) नागपूर महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त अभिजीत बांगर यांनी स्वाक्षरी केली.

# थोडक्यात...

## स्वच्छता अभियानासाठी लोकसहभाग महत्त्वाचा !



नागपूर : स्वच्छ भारत अभियान आता लोकचळवळ बनत आहे. ज्या शहरात स्वच्छ सर्वेक्षणादरम्यान लोकसहभाग होता, त्या शहराने इतिहास रचला. स्वच्छ शहरांच्या यादीत ते शहर पुढारले. नागपूर शहरानेही क्रमवारीत मुसंडी मारली. आता पुन्हा एकदा स्वच्छ सर्वेक्षणात बाजी मारायची असेल तर लोकसहभाग वाढणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन मान्यवरांनी केले.स्वच्छ भारत अभियानांतर्गत होणाऱ्या स्वच्छ सर्वेक्षण २०१९ दरम्यान लोकसहभाग वाढविण्याच्या दृष्टीने लकडगंज झोनअंतर्गत देशपांडे ले–आऊट उद्यानात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.स्वच्छ सर्वेक्षणाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर स्वच्छतेविषयी जनजागृती होत आहे. नागरिक आता स्वच्छतेविषयी जागरुक झालेले आहेत, ही चांगली बाब आहे. स्वच्छ सर्वेक्षणाअंतर्गत कचरा विलगीकरणावर भर देण्यात येत आहे. नागरिकांनी निर्मितीस्थळावरच कचऱ्याचे विलगीकरण केले तर ओल्या कचऱ्यापासून खत आणि सुखा कचऱ्यापासून वीजनिर्मिती करणे सहज शक्य होते. नागपूर महानगरपालिका खतनिर्मिती आणि वीजनिर्मितीसाठी आवश्यक प्रकल्प उभारण्यावर भर देत आहे. त्यामुळे लोकांनी ह्या मोहिमेला लोकचळवळ बनवून नागपूर स्वच्छतेच्या यादीत क्रमांक एकवर आणावे असे आवाहन केले. नगरसेवक बाल्या बोरकर यांनीही स्वच्छता अभियानाचे महत्त्व पटवून दिले. नागपूर महानगरपालिका नागरिकांच्या सेवेसाठी कटिबद्ध आहे. नागरिकांनीही आपली जबाबदारी ओळखून हे शहर स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन केले. उपस्थित सर्व नागरिकांनी स्वच्छता प डाऊनलोड करावे व इतरांनाही करण्यास सांगावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन अश्वजित सोनटक्के यांनी केले. कार्यक्रमाला परिसरातील नागरिक, ज्येष्ठ नागरिक, महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

## स्वच्छ सर्वेक्षणासंदर्भात महापौर, आयुक्तांनी घेतला आढावा



नागपूर : स्वच्छ भारत सर्वेक्षण २०१९च्या संदर्भात महापौर नंदा जिचकार, उपमहापौर दीपराज पार्डीकर, आयुक्त अभिजीत बांगर यांनी सोमवारी (ता. २६) आढावा घेतला. मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहामध्ये यासंबंधी आढावा बैठक घेण्यात आली.बैठकीला सत्ता पक्ष उपनेते बाल्या बोरकर, जलप्रदाय समिती सभापती विजय झलके, प्रतोद दिव्याा धुरडे, ज्येष्ठ नगरसेवक सुनील अग्रवाल, नगरसेविका संगीता गि–हे, अपर आयुक्त राम जोशी, अझीझ शेख, आरोग्य अधिकारी सुनील कांबळे, पशुचिकित्सा अधिकारी गजेंद्र महल्ले, सहायक आयुक्त प्रकाश वराडे, अशोक पाटील, महेश मोरोणे, गणेश राठोड, सुवर्णा दखने, स्मिता काळे, जयदेव, कनक रिसोर्सेचे कमलेश शर्मा यांच्यासह दहाही झोनचे झोनल अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. प्रत्येक घरातून ओला व सुका कचरा वेगवेगळा संकलीत करण्यात यावा. याशिवाय शहरातील मुख्य मार्गांवर कुठेही कच–याचे ढिग दिसू नये यासाठी काळजी घेतली जावी. शहरातील मासोळी व मांस विक्रीच्या बाजारामध्येही स्वच्छता राखली जावी, यासाठी काळजी घेतली जावी, असे यावेळी महापौर नंदा जिचकार यांनी निर्देशित केले. कचरा विलगीकरणाबाबत प्रत्येक झोन स्तरावर जनजागृती करण्यात यावी. यावर पदाधिका–यांसह अधिका–यांची देखरेख असणे आवश्यक आहे. जनजागृतीसंबंधी वार्ड, मोहल्ला सभा घेण्यात याव्यात, असेही निर्देश महापौर नंदा जिचकार यांनी दिले.

## नागपूर महानगरपालिकेमध्ये संविधान दिन साजरा

नागपूर : भारतीय संविधानाबाबत जनजागृती व्हावी व नागरिकांना संविधानाची ओळख व्हा्वी, या दृष्टीने नागपूर महानगरपालिकेमध्ये दरवर्षी २६ नोव्हेंबर हा दिवस भारतीय संविधान दिन म्हणून साजरा करणयात येतो. त्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिकेच्या सर्व शाळा व झोन कार्यालयामध्ये संविधान दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राला पुष्पहार अर्पण करून नागपूर महानगरपालेच्या सर्व शाळांमध्ये व झोन कार्यालयात भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. तसेच शाळा व झोन परिसरात संविधान रॅली, निबंध स्पर्धा, संविधान लेखन स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आदींचे आयोजन करून मोठ्या उत्साहापूर्ण वातावरणात संविधान दिवस साजरा करण्यात आला.

## ६ ते १३ जानेवारीदरम्यान महिला उद्योजिका मेळावा

नागपूर : नागपूर महानगरपालिकेच्या महिला व बाल कल्याण समितीच्या वतीने ६ ते १३ जानेवारी २०१९ दरम्यान महिला उद्योजिका मेळावा आयोजित करण्यात आला आहे. रेशीमबाग मैदानावर आयोजित या महिला उद्योजिका मेळाव्यामध्ये देशभरातील महिला उद्योजकांनी उभारलेल्या संकल्पना आमंत्रित करण्यात येणार आहे. विदर्भासह देशभरातील विविध महिलांनी संघटीत होउन सुरू केलेल्या व्यवसायांचे स्टाल मेळाव्याच्या परिसरात लावण्यात येणार आहेत. याशिवाय दिवसभर विविध कार्यशाळा, मार्गदर्शन कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती महिला व बाल कल्याण समिती सभापती प्रगती पाटील यांनी दिली.

## इंदिरा गांधी जयंतीदिनी घेतली एकात्मतेची शपथ



नागपूर : देशाच्या एकतेसाठी व अखंडतेसाठी लढा देण्या–या भारताच्या प्रथम महिला पंतप्रधान भारतरत्न प्रियदर्शनी स्व.इंदिरा गांधी यांच्या जयंती निमित्त नागपूर महानगरपालिकेतर्फे राष्ट्रीय एकात्माता दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. म.न.पा.सिव्हील कार्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात झालेल्या कार्यक्रमात नगरीच्या महापौर नंदा जिचकार व उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समिती सभापती.विरेन्द्र कुकरेजा, विरोधी पक्ष नेता तानाजी वनवे, म.न.पा.आयुक्त अभिजीत बांगर यांनी स्व.इंदिरा गांधींच्या तैलचित्राला माल्यार्पण करून आदरांजली दिली तसेच उपस्थित अधिकारी/कर्मचा–यांना महापौर नंदा जिचकार यांनी राष्ट्रीय एकात्मतेची शपथ दिली.

# विज्ञानामध्ये विद्यार्थ्यांची रुची वाढविण्यात विज्ञान मेळावा पथदर्शी ठरावा : महापौर नंदा जिचकार

### अपूर्व विज्ञान मेळाव्याचे थाटात उद्घाटन



नागपूर : विद्यार्थ्यांची विज्ञानामध्ये रुची वाढावी, त्यांची विज्ञानाशी मैत्री व्हाविी व हसत खेळत विज्ञानाची अनुभूती घेता यावी यासाठी नागपूर महानगरपालिकेतर्फे आयोजित अपूर्व विज्ञान मेळावा पथदर्शी ठरावा, असा अपेक्षा महापौर नंदा जिचकार यांनी व्यूक्त केली. नागपुरातील विज्ञानप्रेमी विद्यार्थ्यांच्या आवडीच्या 'अपूर्व विज्ञान मेळाव्या'चे उद्घाटन महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते झाले. उद्घाटनप्रसंगी महापौर नंदा जिचकार यांच्यासह शिक्षण समितीचे सभापती प्रा. दिलीप दिवे, क्रीडा समितीचे सभापती नागेश सहारे, उपसभापती प्रमोद तभाने, स्थापत्य व प्रकल्प समितीचे सभापती संजय बंगाले, ज्येष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी, सुनील अग्रवाल, नेहरूनगर झोन सभापती रिता मुळे, नगरेसविका उज्वला शर्मा, उपायुक्त राजेश मोहिते, शिक्षणाधिकारी संध्या मेडपल्लीवार विज्ञान मेळाव्याचे समन्वयक ज्योती मेडपीलवार, कपिलनगर शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र पुसेकर यांची उपस्थिती होती. नागपूर महानगरपालिका व असोसिएशन फॉर रिसर्च ण्ड ट्रेनिंग इन बेसिक सायन्स एज्युकेशन, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने उत्तर अंबाझरी मार्गावरील राष्ट्रभाषा प्रचार समिती येथे आयोजित या मेळाव्यात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सर्व प्रयोगांची माहिती घेत महापौरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. फीत कापून उद्घाटन केल्यानंतर महापौर नंदा जिचकार आणि अन्य मान्यवरांनी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या सर्व प्रयोगांच्या स्टॉल्सला भेट दिली. कुतुहलाने त्यांनी सर्व प्रयोगांविषयी माहिती घेतली. विद्यार्थ्यांना शाबासकी देत त्यांच्यातील कुशाग्र बुद्धीचे कौतुक केले. यावेळी महापौर नंदा जिचकार यांनी बोलताना, विद्यार्थ्यांची विज्ञानाबाबात रूची वाढवी याकरिता यासारखे विज्ञान मेळावे हे विद्यार्थ्यांसाठी फायदेशीर ठरणार आहे. विज्ञानाचे रोज जीवनात होणारा वापर किंवा विज्ञान हे प्रयोगाद्वारे शिकणारा विषय आहे. रोजच्या व्यवहार जीवनातील विज्ञान विद्यार्थ्यांनी समजून घेतले तर विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढेल, असा विश्वास महापौर नंदा जिचकार यांनी व्यक्त केला. २८ नोव्हेंबर ते २ डिसेंबर दरम्यान हा अपूर्व विज्ञान मेळावा उत्तर अंबाझरी मार्गावरील राष्ट्रभाषा भवन येथे आयोजित करण्यात आला आहे. शहरातील सर्व विज्ञानप्रेमींनी या विज्ञान मेळाव्याला भेट द्यावी, असे आवाहन महापौर यांनी केले.

## नाले स्वच्छता, गडर लाईनची समस्या तातडीने सोडवा : महापौर नंदा जिचकार

**महापौर आपल्या दारी:** मंगळवारी झोनमधील प्रभाग १ आणि ९ चा घेतला आढावा



नागपूर : शहरातील वस्त्यांमधून वाहणाऱ्या नाल्यांमुळे वस्तीमध्ये राहणाऱ्या नागरिकांना चांगलाच त्रास सहन करावा लागत आहे. याशिवाय परिसरातील कचरा वेळेवर उचलण्यात येत नसल्याने नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागतो. परिणामी विविध आजारांच्या विळख्यामध्ये नागरिक जात आहेत. त्यामुळे वेळेवर कचरा उलचणे व नाल्यांची सफाई त्वरित केली जावी यासाठी तातडीने उपाययोजना करा, असे निर्देश महापौर नंदा जिचकार यांनी मंगळवारी झोन अंतर्गत प्रभाग १ आणि ९ च्या दौऱ्यामध्ये दिले.शहरातील नागरिकांच्या समस्या, त्यांच्या अडचणी जाणून घेऊन त्यावर उपाययोजनांसाठी महापौर नंदा जिचकार यांनी 'महापौर आपल्या दारी' उपक्रमाची सुरूवात केली. या उपक्रमांतर्गत २८ नोव्हेंबर रोजी त्यांनी मंगळवारी झोनमधील प्रभाग १ व ९ मधील वस्त्यांमध्ये भेट दिली. याप्रसंगी स्थायी समिती सभापती वीरेंद्र कुकरेजा, यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी, अभियंता व कर्मचारी उपस्थित होते. महापौर नंदा जिचकार यांनी प्रभाग १ मधील बेझनबाग येथील हर्षवर्धन बुद्ध विहारामधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून दौऱ्याला सुरूवात केली. यावेळी महापौरांनी जरीपटका चौकातील जिंजर मॉलसमोरील भाजी बाजाराला भेट दिली. आपल्या परिसरात नेहमी स्वच्छता राहावी, यासाठी नागरिकांनी काळजी घ्यावी. तसेच भाजी बाजारामध्ये दुकानांमधून निघणाऱ्या कचऱ्याची वेळेवर योग्य विल्हेवाट लावावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. भाजी बाजारासाठी जागा निश्चित असतानाही रस्त्यावर दुकाने लावून वाहतुकीस अडथळा निर्माण करणारी दुकाने हटवून त्यांना भाजी बाजारात जागा उपलब्ध करून देण्याचे निर्देशही महापौर नंदा जिचकार यांनी यावेळी दिले. यानंतर महापौर व मान्यवरांनी जरीपटका येथील चावला चौकातील नारायण संत गोदडीवाले बाबा हरदास साहिब यांच्या मंदिरामध्ये भेट दिली. यावेळी मंदिराच्या पदाधिकाऱ्यांनी महापौर नंदा जिचकार यांच्यासह सर्व मान्यवर पदाधिकाऱ्यांचा शाल देऊन सत्कार केला. परिसरातील दहन घाटावर प्रसाधनगृह बांधून तयार असून केवळ पाण्याअभावी ते सुरू नाही. या ठिकाणी त्वरित पाण्यासाठी पाईप लाईन टाकून हे प्रसाधनगृह सुरू करून नागरिकांसाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच परिसरात दररोज स्वच्छता करण्यात यावी, असेही महापौर नंदा जिचकार यांनी यावेळी निर्देशित केले. याशिवाय प्रभागामध्ये सिमेंट रस्ते, पथदिवे, समाज भवन आदींची सुविधा करण्याचीही मागणी यावेळी परिसरातील नागरिकांनी महापौरांना केली.



## कामगारांच्या बालकांसाठी मनपा सुरू करणार अटल बालसंगोपन केंद्र

नागपूर : आर्थिकदृष्ट्या कमकुवत व मिळेल ते काम करून उदरनिर्वाह करणाऱ्या कामगार वर्गातील बालकांसाठी नागपूर महानगरपालिकेतर्फे अटल बालसंगोपन केंद्र सुरू करण्यात येणार आहे. यासंबंधी तयार करण्यात आलेल्या प्रस्तावाचा लवकरात लवकर आढावा घेऊन पुढील कार्य सुरू करण्यात यावे, असे निर्देश महिला व बालकल्याण समिती सभापती प्रगती पाटील यांनी दिले.मनपाच्या महिला व बालकल्याण समितीतर्फे २७ नोव्हेंबर रोजी विविध विषयांसंदर्भात बैठक घेण्यात आली. यावेळी सभापती प्रगती पाटील यांनी पाळघरासंदर्भात अधिकाऱ्यांना निर्देश दिले. मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहात आयोजित बैठकीला उपसभापती विशाखा मोहोड, सदस्या दिव्या धुरडे, सविता कावरे, मनिषा अतकरे, वैशाली नारनवरे, उपायुक्त रंजना लाडे, शिक्षणाधिकारी संध्या मेडपल्लीवार, आरोग्य अधिकारी डॉ. सुनील कांबळे आदी उपस्थित होते. दिवसभर कामावर जाणाऱ्या कामगार वर्गातील मुलांच्या संगोपनाचा प्रश्न नेहमीच ऐरणीवर राहिला आहे. दिवसभर आई–वडील घरी नसल्याने या मुलांवर वाईट गोष्टींचा प्रभाव पडतो. अनेकदा ही बालके अत्याचाराचेही बळी पडतात. यावर नागपूर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाने पुढाकार घेत या बालकांचे संगोपन व त्यांना संस्कारीत करण्यासाठी संगोपन केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या संगोपन केंद्रात शून्य ते ५ वर्ष वयापर्यंतची मुले व १३ वर्ष वयापर्यंतच्या मुलींना प्रवेश देण्यात येईल. संगोपन केंद्रासाठी काछीपुरा येथे जागा उपलब्ध करून देण्यात आली असल्याचेही यावेळी महिला व बालकल्याण समिती सभापती प्रगती पाटील यांनी सांगितले. १०० बालकांची क्षमता लक्षात घेऊन हे बाल संगोपन केंद्र सुरु करण्यात येत आहे. संगोपन केंद्रात दिवसभर राहणाऱ्या मुलांची एकवेळची खाण्याची व्यवस्था तसेच त्यांना दूधही देण्यात येणार आहे. शिवाय सुरक्षेच्या दृष्टीने येथे सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचीही व्यवस्था करण्यात येणार असल्याचे सभापती प्रगती पाटील यांनी सांगितले.

# विहिरींच्या स्वच्छतेबाबत आठवडाभरात आढावा घ्या!

### महापौर नंदा जिचकार यांचे निर्देश



नागपूर : यंदा पुरेशा प्रमाणात पाऊस न पडल्याने जलाशयामध्ये आवश्यकतेनुसार पाणी साठा झालेला नाही. त्यामुळे यंदा उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची टंचाईची समस्या पुढे उभी आहे. नागपूर शहरामध्ये एकूण ७८४ विहीर असून त्यापैकी ५४३ विहिरी वापरण्याजोग्या अवस्थेत आहेत. यापैकी जलप्रदाय समितीने सार्वजनिक बांधकाम विभागाला ३४३ विहिरी साफ करण्यासाठी प्रस्ताव दिला होता. मात्र या विहिर साफ न करता केवळ येथील पाणी बाहेर फेकण्यात आल्याची तक्रार होत आहे. यासंबंधी येत्या आठवडाभरात आयुक्तांनी आढावा घ्यावा, असे निर्देश महापौर नंदा जिचकार यांनी दिले.२६ नोव्हेंबर रोजी मनपाच्या डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहामध्ये पिण्याच्या पाण्याची उपलब्धता व साठा या संदर्भात महापौर नंदा जिचकार यांच्या अध्यक्षतेत बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीमध्ये उपमहापौर दीपराज पार्डीकर, आयुक्त अभिजीत बांगर, जलप्रदाय समिती सभापती विजय झलके, उपनेते बाल्या बोरकर, ज्येष्ठ नगरसेवक सुनील अग्रवाल, नगरसेविका संगीता गि–हे, अपर आयुक्त राम जोशी, अझीझ शेख, अधिक्षक अभियंता (लोककर्म) मनोज तालेवार, कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) प्रदीप राजगीरे, सहायक आयुक्त प्रकाश वराडे, अशोक पाटील, महेश मोरोणे, सुवर्णा दखने, स्मिता काळे, ओसीडब्ल्यूचे श्री. रॉय, श्री. सिंग, श्री. कालरा, राहुल कुळकर्णी आदी उपस्थित होते. पुढे बोलताना महापौर नंदा जिचकार म्हणाल्या, नागपूर शहराला पेंच जलाशयामधून पाणी पुरवठा करण्यात येतो. याशिवाय अतिरिक्त पाणी गोरेवाडा जलाशयामधून देण्यात येते. मात्र यंदा पेंच जलाशयामध्ये पाणीसाठा कमी आहे. शहरात ७८४ विहिर व ४९०० बोअरवेल आहेत. मात्र येथील पाण्याचा वापर कमी प्रमाणात होत आहे. या विहिर व बोअरवेलमधील पाण्याची चाचणीही आजपर्यंत करण्यात आली नाही. या पाण्याची तपासणी करण्यासाठी कायनियोजन करण्यात आले आहे, यासंबंधीही माहिती यावेळी महापौर नंदा जिचकार यांनी मागितली. बोअरवेल व विहिरींमधील पाण्याची चाचणी करून बोअरवेलला लाल किंवा हिरवा रंग देण्यात यावे. याशिवाय या ठिकाणी त्यासंबंधी फलक लावण्याचे निर्देश महापौरांनी यावेळी दिले. विहिर व बोअरवेलमधील पाण्याच्या चाचणीसाठी कर्मचारी नियुक्त करून त्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे नागरिकांना सहजतेने पिण्याचे पाणी मिळेल, अशी आशाही महापौर नंदा जिचकार यांनी यावेळी व्यक्त केली.

## 'छठ पूजा' एकात्मतेचे दर्शन घडविणारा उत्सव : महापौर नंदा जिचकार



नागपूर : छठ व्रत पूजेमध्ये केवळ उत्तर भारतीय नागरिकच नव्हे तर नागपुरातील नागरिक आस्थेने सहभागी होतात. हा धार्मिक सण एकात्मतेचे दर्शन घडविणारा उत्सव ठरत आहे, असे प्रतिपादन महापौर नंदा जिचकार यांनी केले.उत्तर भारतीयांच्या श्रद्धेचा धार्मिक उत्सव छठ पूजा निमित्ताने मंगळवारी सायंकाळी हजारो उत्तर भारतीयांनी मावळत्या सूर्यदेवाला अर्घ्य अर्पण केले. या उत्सवात सहभागी झालेल्या बांधवांचे नागपूर महानगरपालिकेच्या वतीने स्वागत करण्यात आले. या धार्मिक उत्सवातील स्वागत सोहळ्यात त्या बोलत होत्या.यावेळी मंचावर ज्येष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी, ज्येष्ठ नगरसेवक सुनील अग्रवाल, सत्तापक्ष उपनेत्या वर्षा ठाकरे,नगरसेविका रूपा राय, उमा तिवारी उपस्थित होत्या. महापौर नंदा जिचकार पुढे म्हणाल्या,अर्घ्य अर्पण करण्यासाठी अंबाझरी तलावावर येणाऱ्या भाविकांची संख्या दरवर्षी वाढत आहे. दरवर्षी नागपूर महानगरपालिका या धार्मिक सणासाठी सुरक्षेच्या दृष्टीने संपूर्ण व्यवस्था करते.महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात १० लाख रुपयांची विशेष तरतूद या सणाकरिता करण्यात आली असल्याचे सांगत उत्सवात सहभागी झालेल्या सर्व भक्तांचे नागपूर महानगरपालिकेच्या वतीने त्यांनी स्वागत केले. ज्येष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी यांनी शुभेच्छा देताना सांगितले की, नागपूर महानगरपालिका छठ पूजा उत्सवाची संपूर्ण तयारी करीत असते. या उत्सवाचे पालकत्व नागपूर महानगरपालिकेने स्वीकारले आहे. बॅरिकेटिंग, विद्युत दिवे,ध्वनिक्षेपक आदी व्यवस्था दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी चोखपणे करण्यात आली आहे.अग्निशमन विभागाचे जवान बोटींगद्वारे व्यवस्थेवर लक्ष ठेवून आहेत. भक्तांना कुठलाही त्रास होऊ नये यासाठी नागपूर महानगरपालिका प्रशासन आणि यंत्रणा दिवसरात्र राबत असल्याचे त्यांनी सांगितले. ज्येष्ठ नगरसेवक सुनील अग्रवाल यांनीही यावेळी मार्गदर्शन केले आणि छठ पूजेमध्ये सहभागी झालेल्या भक्तांना शुभेच्छा दिल्या. यावेळी वेस्टर्न कोलफिल्डर लिमिटेडचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक आर. आर.मिश्रा यांचे स्वागत ज्येष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी यांनी केले.